REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ५ आक्टोबर, १९४९ अंक ४०


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
## लिमिटेड, पुणें २.

### महाराष्ट्रांत

(१) महाराष्ट्रांत साखरेचा धंदा १० टक्के नफ्यांत चालतो.
(२) उंसाचें उत्पन्न दर एकरीं "सुरूं" ४५ टन व "आडसालीं" ६० टन मिळूं शकतें. सिंडिकेटच्या जमिनी चांगल्या आहेत व उंसाचें उत्पन्न दर एकरीं वरीलप्रमाणें मिळूं शकतें असा प्रत्यक्ष अनुभव आहे.
(३) उंसाचें गाळित डिसेंबर ते एप्रिल या पांच महिन्यांत संपविल्यास साखरेचा उतारा १२ टक्के मिळूं शकतो.

---

(१) गूळ करण्यास सरकारकडून बंदी करण्यांत आल्यामुळें दररोज एक हजार टन ऊंस गाळील इतकी मोठी नवीन सोमि अिलेक्ट्रिक माशिनरी कंपनीनें विकत घेतली आहे. नवीन माशिनरीनें उसाचें गाळित डिसेंबर ते एप्रिलअखेर संपवितां येईल.
(२) नवीन माशिनरीची किंमत मुंबई-पोंच तीस लक्ष रुपये आहे. ७५ टक्के माशिनरी मुंबईस आली आहे व २५ टक्के सप्टेंबरअखेर निघून मुंबईस नोव्हेंबर महिन्यांत येईल.
(३) नवीन मशिनरी व कारखान्याची उभारणी याकरितां साडेबेचाळीस लक्ष रुपयांच्या शेअर-विक्रीची सरकारकडून परवानगी मिळाली आहे.

---

### हा महाराष्ट्रीय साखर–कारखाना

(१) मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय जनतेच्या भांडवलावर यशस्वी झालेला आहे.
(२) गेलीं सात वर्षें शेअरवर १० टक्के नफा व ठेवींवर ६ टक्के व्याज कंपनीनें दिलेलें आहे.
(३) १९४८–४९ हंगामांत कंपनीची चाळिस लक्ष रुपयांची साखर तयार झाली.
(४) १९४९–५० हंगामांत साखरेचे भाव कमी झाले तरी चाळीस लक्ष रुपयांची साखर कंपनीला तयार करतां येईल असा अंदाज आहे.

---

**सरकारी नियमाप्रमाणें भागीदार व त्यांचे मित्र यांना शेअर–विक्री सुरू आहे.**

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

**मुदत एक वर्ष द. द. शेंकडा ५ टक्के व्याज**
**मुदत दोन वर्षें द. द. शेंकडा ५॥ टक्के व्याज**
**मुदत तीन वर्षें द. द. शेंकडा ६ टक्के व्याज**
**व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जाईल.**

चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. अे., अेल्अेल. बी.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव, लक्ष्मी रोड, पुणें २.

**सी. जी. आगाशे आणि कंपनी,**
मॅनेजिंग एजण्टस्.

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

**या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.**

**केळकर बंधु, पुणें व नाशिक.**


## विविध माहिती

**पोलादाच्या कंपन्यांना सरकारी कर्ज**—इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनी आणि स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल ह्या दोन पोलादाच्या कंपन्यांना भारत सरकार ५ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचा संभव आहे असें समजतें. टाटा लोकोमोटिव्ह एंजिनिअरिंग वर्क्स ह्या कंपनीलाही २ कोटी रुपयांचें कर्ज मिळण्याचा संभव आहे.

**जर्मनींत ब्रिटिश-विरोधी प्रचार**—ब्रिटिश पार्लमेंटचे एक सभासद मि. क्रॉसमन ह्यांनीं एका लेखांत असे विचार व्यक्त केले आहेत, कीं जर्मनींतील अमेरिकन सेनापती दोस्त म्हणून फ्रेंचांचा स्वीकार करण्यापेक्षां जर्मनांनाच अधिक पसंत करतात. त्याचप्रमाणें, जर्मनींत ब्रिटिश-विरोधी प्रचारलाही ते हातभार लावीत आहेत.

**गुरांचे व पिकांचे विमे**—मुंबई येथें भारतांतील प्रमुख विमागणितींची एक परिषद मध्यवर्ती सरकारचे शेतकी खात्याचे चिटणीस, श्री. पंजाबी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. कांहीं विवक्षित भागांत निवड केलेल्या पिकांचा विमा उतरण्याच्या एका प्रयोगात्मक योजनेची शिफारस परिषदेनें सरकारला केली आहे. दुसरी एक योजना गुरांच्या विम्याविषयीं सुचविण्यांत आली आहे.

**ब्रिटिश कोकोच्या धंद्याला धोका**—आफ्रिकेंतील गोल्डकोस्ट ह्या पश्चिम किनाऱ्यावरील वसाहतींतून जगाला त्याच्या कोकोपैकीं जवळजवळ निम्मा पुरवठा होतो. ह्या धंद्याला शास्त्रीय साह्य मिळालें नाहीं तर १९५६ च्या सुमारास ती आजिबात बसेल असा इषारा देण्यांत आला आहे. कोकोचीं रोगग्रस्त झाडें कापून टाकून नवीं लावणें येवढाच उपाय लागू पडण्यासारखा आहे. ह्या वसाहतींतील एकूण कोकोचीं झाडें ४०,००,००,००० असावीं. १९३८ सालीं १०,००,००० झाडें रोगग्रस्त होतीं. १९४७ सालापर्यंत दर वर्षी ५०,००,००० झाडें किडीनें मरूं लागलीं आहेत. गोल्ड कोस्ट मार्केटिंग बोर्डानें ज्या शेतकऱ्यांचीं झाडें वठलीं आहेत त्यांना नवीन झाडें लावण्यासाठी मदत म्हणून ९०,००,००० पौंड (१२ कोटी रुपये) मंजूर केले आहेत.

**तंबाखूचा भाव चढणार**—लंडन येथील तंबाखूच्या व्यापाऱ्यांच्या मतानें पौंडाची किंमत उतरविल्यामुळें भारतांतील आणि पाकिस्तानमधील तंबाखूला ब्रिटनमध्यें जोराची मागणी येऊन, तंबाखूचा भाव तेजींत राहील.

**परकीय मालकीचीं वृत्तपत्रें**—कांहीं अमेरिकन वृत्तपत्रांचे मालक हिंदुस्थानांत वृत्तपत्रें काढण्याच्या खटपटींत आहेत. ह्या संबंधीं भारताच्या घटना समितींत प्रश्न विचारण्यांत आला असता असें उत्तर देण्यांत आलें कीं, भारतांतील चालू व्यवसाय परकीय लोकांनी घेण्याला आडकाठी करणारें एखादें कलम कायद्यांत नाहीं. तथापि, सरकार ह्या परिस्थितीवर लक्ष ठेवीत आहे.

**भारतांत ब्रिटिश मोटारींचा कारखाना**—भारत सरकारनें एका ब्रिटिश कंपनीला ह्या देशांत मोटारी जुळविण्याचा कारखाना घालण्याची परवानगी दिली आहे. भारतांत १९५४ च्या सुमारास ४० ते ५० हजार मोटारींची मागणी येईल. ब्रिटिश मोटार कारखानदारांपैकीं रूटस गटानें सरकारच्या परवानगीप्रमाणें १ कोटी रुपये भांडवलाची कंपनी काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांत दरवर्षी ३,००० मोटारी जुळविल्या जातील. नंतर मोटारी तयार करण्याचें कामही कारखाना चालू करील.

**पाकिस्तानी रुपया स्थिर रहाणार**—पौंडाची किंमत कमी झाल्यानें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी पाकिस्तानच्या मंत्रिमंडळाची बैठक भरली होती. पाकिस्तानच्या रुपयाची किंमत अमेरिकन डॉलर्समध्ये कमी करावयाची नाहीं असा निर्णय घेण्यांत आला आहे. पाकिस्तानला डॉलर्सच्या कक्षेंतील देशांकडून माल आयात करण्याची निकडीची गरज नाहीं, त्यामुळें पाकिस्तानला असा निर्णय घेणें शक्य झालें.

**सीलोनी रुपयाची हिंदी रुपयाशी फारकत**—सीलोनचे अर्थमंत्री श्री. जयवर्धन ह्यांनीं सीलोनचा रुपया आणि हिंदी रुपया ह्यांमधलि हुंडणावळींचे संबंध तोडण्यांत आल्याचें जाहीर केलें आहे. पौंडाच्या प्रमाणांत सीलोनी रुपयाची किंमत उतरविण्यासंबंधीं हिंद काय करणार ह्याची कल्पना नसल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला.

**पौंडाची घसरण आणि मास्को**—मास्को नभोवाणीनें पौंडाच्या उतरलेल्या भावावर टीका करतांना असें सांगितलें कीं, "ह्या घसरगुंडीमुळें मार्शल-मदत घेणारीं युरोपांतील राष्ट्रें घाबरून गेलीं आहेत. ब्रिटनच्या मजूर पुढाऱ्यांनीं आपलीं आश्वासनें बाजूला ठेवून अमेरिकेपुढें शरणागति स्वीकारली आहे. थोडक्यांत म्हणजे, ब्रिटनला लोण्याऐवजीं आतां बंदुका मिळणार आहेत."

**रेडिओच्या परवाना-फींत वाढ**—रेडिओ वापरण्यासाठीं घेण्यांत येणाऱ्या परवाना-फींत १ नोव्हेंबरपासून वाढ करण्यांत येण्याचें जाहीर झालें आहे. घरगुती रेडिओला सध्या वार्षिक १० रुपये फी पडते ती आतां १५ रुपये पडेल. क्रिस्टल सेटला १० रुपये फी पडेल; शाळांतील रेडिओंना मात्र फक्त ३ रुपये फी पडेल.

**ब्रिटिश सरकारची कपात**—चालू वर्षांत सर्व सरकारी खात्यांनीं आपआपल्या खर्चांत निदान ५ टक्के कपात करावी असा हुकूम इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. ॲटली ह्यांनीं काढला आहे. पुढील वर्षाच्या ४०० कोटी पौंडांच्या अंदाज पत्रकांत कमींत कमी १५ कोटींची बचत करण्याची सूचना ह्यापूर्वीच करण्यांत आली होती.

**अमेरिकेंत संपाची वावटळ**—अमेरिकेंतील लोखंड व कोळसा कामगार संपावर जाण्याच्या विचारांत आहेत. फोर्ड आणि युनायटेड ऑटोमोबाईल वर्कर्स युनिअननेंही ता. २९ सप्टेंबरपासून संपावर जाण्याचा निर्धार केला आहे. कामगारांना मिळावयाच्या पेन्शनच्या रकमेवरून वाद निर्माण झाला आहे.

**चित्रपटगृहांना सिलें**—कराचींतील निर्वासितांच्या मालमत्तेच्या अधिकाऱ्यानें चार चित्रपटगृहांना सिलें ठोकलीं आहेत. ह्या चार गृहांत पॅरॅडाइज हें कराचींतील सर्वांत उत्कृष्ट चित्रपटगृहहि आहे.

**पाकिस्तानांत साखरेचा कारखाना**—पूर्वीच्या वायव्य सरहद्द प्रांतांतील मरदन येथें पाकिस्तान एक मोठा साखरेचा कारखाना उभारीत आहे. हा कारखाना जगांतील एक सर्वोत्कृष्ट समजला जाईल. कारखान्याचें काम पुरें होत आलें असून १९५० च्या प्रारंभीं साखरेच्या उत्पादनाला प्रारंभ होईल असें समजतें. सुरवातीला रोज ४५० टन पांढरी साखर काढण्याची ह्या कारखान्याची पात्रता आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ५ आक्टोबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


# हिंदी आर्थिक अरिष्ट कसें टळेल?

## गोरवाला कमिटीचें निदान व उपाययोजना

### नफेबाजीच्या प्रवृत्तीस आळा

हिंदी मालाची निर्गत वाढविण्याच्या मार्गांतील अडचणींचा विचार करून, त्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरितां भारत सरकारनें श्री. ए. डी. गोरवाला ह्यांचे अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. आयातींत वाढ आणि निर्गतींत घट व त्यामुळें देण्या–घेण्यांतील वाढती तफावत ह्यांचे बुडाशीं असलेल्या मूलग्राही प्रश्नांचा विचार कमिटीनें करून आपल्या सूचना केल्या आहेत. हिंदी कारखानदार आपलें वाजवी कर्तव्य बजावीत नाहींत आणि साठेबाजांच्या सोडतीच्या व्यवहारांमुळें निर्गतीच्या व्यापारास फार मोठा व्यत्यय येत आहे, असें कमिटीचें मत आहे. कांहीं कारखानदारांची व नफेबाजांची ही प्रवृत्ति सुधारणें कठीण आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु त्यांत सरकार कितपत कठोरपणा दाखवितें ह्यावरच भारताचें भवितव्य अवलंबून आहे, असा कमिटीच्या अहवालचा निष्कर्ष काढतां येईल.

युद्धसमाप्तीनंतर सरकारी धोरणांत कित्येक वारंवार बदल होत गेले. हुंडणावळीची बचत करावी म्हणून आयातीवर बंधनें घालण्याची आवश्यकता सरकारास एकदा वाटली, तर कांहीं काळानें हेंच धोरण दुसऱ्या टोकास गेलें. उपलब्ध हुंडणावळीचा पुरेसा उपयोग करतां येत नाहीं, म्हणून भरमसाट आयात होऊं देण्यांत आली. आयातीचें मान सरकारी धोरणाच्या अनिश्चितपणावर किती अवलंबून राहिलें आणि मालाची उपलब्धता व त्याची किंमत ह्याचा त्या बाबतींत कितपत परिणाम झाला, हें सांगणें अर्थातच सोपें नाहीं. अंतर्गत व आयाति मालाच्या किंमतींमधील मोठी तफावत म्हणजे देशी मालाची महर्गता, ही आयात-निर्गतीमधील अडचणींच्या बुडाशीं आहे. अंतर्गत उत्पादनाची किंमत कमी करणें भारत सरकारास शक्य झालें नाहीं, म्हणून विदेशी मालाच्या आयातीस प्रोत्साहन देणें त्यास भाग पडलें. परदेशांतून माल आला तो सर्व कांहीं तातडीच्या गरजेचा नव्हता. परंतु तो इतक्या मोठ्या प्रमाणावर आला, कीं त्यामुळें येण्या-देण्याची घडी पार विसकटून गेली आणि जी मौल्यवान गंगाजळी महत्त्वाच्या जिनसांसाठीं वास्तविक उपयोगांत आणावयास हवी होती, ती उपभोक्त्यांच्या अनावश्यक गरजांच्या समाधानासाठी वापरली गेली.

मालाच्या आयातींत वाढ होण्यास किंमतीमधील तफावत हें जसें प्रमुख कारण आहे, तसेंच तें निर्गतींत घट होण्यासहि आहे. आंतरराष्ट्रीय बाजारांत एकाद्या देशाचा माल किती यशस्वी रीतीनें स्पर्धा करूं शकतो, ह्यावरच त्याचा उठाव अवलंबून असतो. जागतिक व्यापाराचें मान वाढत असताहि हिंदी मालाचें त्यांतील प्रमाण वाढूं शकलें नाहीं, ही परिस्थिति काय दर्शविते? हिंदी मालाची किंमत भरमसाट ज्यास्त आहे. परदेशी किंमती स्वस्त असल्या तर निर्गत वाढण्याऐवजी आयातच वाढणार आणि येण्यापेक्षा देणें ज्यास्त निघूं लागणार, हें स्पष्ट आहे. अंतर्गत किंमती कमी केल्याविना निर्गत वाढविण्याची भाषा व्यर्थ आहे. किंमती पुष्कळच उतरविल्याशिवाय निर्गत थोडीसुद्धां वाढणें अशक्यप्राय आहे.

तयार मालाच्या किंमती उतरविल्या खेरीज निर्गत अशक्य आहे, तसेंच मजुरी कमी केल्याखेरीज किंमती कमी होणार नाहींत. परंतु मजुरी प्रथम कमी करून किंमती उतरविण्याचा प्रयत्न करणें चुकीचें होईल, असा इशारा कमिटीनें दिला आहे. किंमती कमी करून नंतरच मजुरी कमी करणें इष्ट ठरेल. नफ्यावरहि तात्काळ नियंत्रण आलेंच. कांहीं किमान मजुरीच्या खाली मात्र, जातां कामा नये, हेंहि कमिटीनें नमूद केलें आहे.

सरकार सध्या अन्नधान्याच्या पिकाखालील क्षेत्रांत वाढ करण्याचे प्रयत्न करीत आहे. ज्या पिकांच्या निर्गतीस परराष्ट्रांत चांगली किंमत येईल आणि ज्यामुळें भारी किंमतीची आयात थांबविता येईल, अशा पिकांस सरकारनें प्राधान्य द्यावें; म्हणजे सरकारचें शेतीविषयक धोरण आणि निर्गत वाढविण्याचें धोरण हीं संबंधित असावीं, असेंहि कमिटीनें सुचविलें आहे. जनावरांची हत्या थांबविल्यानें कातड्याचा निर्गत व्यापार रोडावेल व अंतर्गत परिस्थितीवर त्याचे कांहीं प्रतिकूल परिणाम होतील, असाहि कमिटीचा अभिप्राय आहे.

हिंदी कारखानदारांना निर्गतीचें महत्त्व पटलें नाहीं, तर सब खटाटोप निष्फळ ठरण्याची भीति आहे. "देशांतील भारी किंमतीस आणि मालाच्या तात्काळ विक्रीस कारखानदार चटावले आहेत आणि माल निर्गत करण्याकडे त्यांनीं अजिबात दुर्लक्ष केलें आहे. ही त्यांची वृत्ति पालटून त्यांनीं बदललेल्या परिस्थितीची जाणीव बाळगणें अत्यावश्यक आहे. कच्च्या मालाची निर्गत कमी होत आहे तिची जागा औद्योगिक मालाच्या निर्गतीनें घ्यावी, अशी तळमळ कारखानदारांना वाटली नाहीं तर देशाचें भरून न काढतां येण्याजोगें कमालीचें नुकसान होणार आहे.' असा गंभीर इशारा कमिटीनें दिला आहे. आपला माल निर्गत करण्याजोग्या पात्रतेचा आहे, हेंहि कारखानदारांनीं पाहिले पाहिजे. गिऱ्हाइकास काय हवें, तेंच त्यांनीं तयार करून दिलें पाहिजे.

साठेबाजी व सोडतीचे व्यवहार ह्यांचा आपल्या निर्गतीवर अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो, हें लोकांच्या नीटसें लक्षांत येत नाहीं. भरमसाट पैसे असणारे कांहीं थोडे लोक मालाचे मोठाले साठे करतात आणि त्याला अवाच्या सवा किंमत येण्याची वाट पहात बसतात; युद्धकाळांत, अशा प्रवृत्तीच्या लोकांनीं कमालीचे नफे मिळविले. ह्या नफ्याच्या रकमेचा उपयोग ज्या मार्गानें केला जातो तो मार्ग किंमती स्थिर राहण्यास व मालाच्या निर्गतीस प्रोत्साहन मिळण्यास मुळींच सहायकारक नाहीं. अशा प्रकारच्या समाज-विघातक धोरणास, चहा किंवा कापड वगळल्यास, बाकी सर्व प्रकारचा माल बळी पडलेला आहे. ह्या गंभीर परिस्थितीवर सरकारनें तात्काळ उपाययोजना करावी, अशी कमिटीची शिफारस आहे.

## पौंडाच्या घसरगुंडीचें रहस्य व हिंदची परिस्थिति

लेखकः—भास्कर महादेव काळे.

पौंडाचा भाव उतरविण्यांत आल्यामुळें आर्थिक जगांत फार गंभीर वातावरण निर्माण झालें आहे. दोन महिन्यापूर्वी कांहीं झालें तरी पौंडाचा भाव कमी करावयास आपण संमति देणार नाहीं, असें सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं निक्षून सांगितलें असतां पौंडाचा भाव कमी केला जातो ही गोष्ट अमेरिकेचें आर्थिक वर्चस्व वाढत चाललें आहे हें स्पष्टपणें दाखवितें व परिस्थिति डोईजड झाल्यामुळेंच केवळ अपरिहार्य म्हणून इंग्लंडनें हा मार्ग स्वीकारला हें स्पष्ट होतें. प्रस्तुत लेखकानें ता. ११–१२–१९४६ च्या 'अर्थ'च्या अंकांत "अमेरिकेचें आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरण व हिंदुस्थान" या विषयावर लिहितांना अमेरिकेचें आर्थिक धोरण बाधक झाल्याशिवाय राहाणार नाहीं व विशेषतः हिंदुस्थाननें या अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वापासून सावध राहावें असें सुचविलें होतें. त्यावेळीं व्यक्त केलेली विचारसरणी आज प्रत्यक्ष अनुभवास येत आहे.

चलनाची किंमत कमी करून देशाच्या निर्यात मालाला चालना मिळतें हें सामान्य तत्त्व आहे, परंतु यामुळें बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीला कायमचें तोंड देतां येत नाहीं. तसें असतें तर हा मार्ग स्वीकारून अनेक प्रसंगीं निरनिराळया राष्ट्रांनीं आपली परिस्थिति सुधारली असती. निर्यातीला चालना मिळाली तरी निर्यात मालाची किंमत कमी होते, व कमी होणाऱ्या किंमतीपेक्षां बऱ्याच प्रमाणांत निर्यात मालाचा उठाव झाला तरच परिस्थिति थोडीशी सुधारूं शकते. परंतु आयात माल महाग झाल्यामुळें त्यासाठी निर्यातहि वाढवावी लागते व आयात होणारा माल हा अन्नधान्य किंवा यंत्रसामुग्री यासारखा आवश्यक माल असला तर त्यांत कपात करूनहि चालत नाहीं. आयात माल जर चैनीच्या स्वरूपाचा असला तरच त्यांत कपात करतां येणें शक्य असतें. चलनाची किंमत कमी करून निर्यात वाढून परिस्थिति थोडीशी सुधारूं शकली तर एकंदर देशाची अर्थव्यवस्था व उत्पादन यांत जरूर ती सुधारणा करतां येते. ही सुधारणा करावयाची म्हणजे भांडवल व यंत्रशास्त्रज्ञ आणि धंद्यांतील संघटना ह्या गोष्टी त्या देशांत भरपूर प्रमाणांत असावयास पाहिजेत. इंग्लंडसारख्या देशांत संघटना व यंत्रशास्त्रज्ञ या गोष्टी भरपूर प्रमाणांत असल्यामुळें त्या देशाला पौंडाची किंमत कमी करून निर्माण होणाऱ्या परिस्थितींत आपली अर्थव्यवस्था सुधारतां येईल

चलनाची किंमत कमी करण्याच्या बुडाशीं वरील प्रकारचें तत्त्व असल्यामुळें ह्या परिस्थितीचा हिंदवर काय परिणाम होईल याचा थोडक्यांत विचार करूं. पौंडाची किंमत कमी केल्यामुळें रुपयाची किंमतहि परराष्ट्रीय हुंडणावळीसाठी कमी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हिंद ब्रिटिश राष्ट्रसंघाचा व अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचा सभासद असल्यामुळें रुपयाचा दर कमी करणें अपरिहार्य आहे. याचा परिणाम असा होईल कीं हिंदचा माल ३०॥ टक्क्यांनीं स्वस्त झाल्यामुळें त्याचा खप अमेरिकेच्या बाजारपेठत जास्त प्रमाणांत होणें शक्य परंतु किंमत ३०॥ टक्क्यांनीं उतरल्यामुळें प्रत्यक्ष मालाचा खप पूर्वीच्या दीडपट झाला तरच निदान थोडे जास्त डॉलर्स हिंदला मिळणें शक्य आहे. हिंदचा निर्गत माल दीडपट प्रमाणांत अमेरिका खरेदी करील काय ह्या प्रश्नाचें होकारार्थी उत्तर आलें तरच हिंदला जास्त डॉलर्स मिळतील. त्यांतल्यात्यांत विशेष प्रयत्न केले तर चहाचा खप मात्र वाढणें शक्य आहे. कारण अमेरिकेंत चहाच्या खपाचें प्रमाण वार्षिक दर माणशीं अर्धा पौंड इतकें कमी आहे, तर इंग्लंडमध्यें तेंच १३ पौंड आहे. तागाचा माल जास्त खपला तर मात्र हिंदला फायदा होईल. परंतु अलिकडे कांहीं प्रमाणांत अमेरिका तागाऐवजीं जाड कागद किंवा इतर कांहीं पदार्थ यांचा उपयोग करूं लागली आहे. तेव्हां चहा व कांहीं हस्तकौशल्याचा माल एवढाच अमेरिकेंत जास्त प्रमाणांत खपूं शकणें संभवनीय आहे. आतां अमेरिकेंतून होणारा आयात माल म्हणजे यंत्रसामुग्री व धान्य. धान्याचें अंतर्गत उत्पादन वाढल्यास अमेरिकेंतून धान्य आयात करावें लागणार नाहीं. परंतु आजच्या स्थितींत यंत्रसामुग्रीची अमेरिकेंतून आयात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अमेरिकेचा आयात माल ३०॥ टक्क्यापेक्षांहि जास्त प्रमाणांत; बहुतेक ४० टक्क्यांपर्यंत महाग होईल; व धान्याची आयात अजिबात बंद केली तरी यंत्रसामुग्री इ० च्या आयातीवरच जवळ जवळ पूर्वीइतकाच खर्च करावा लागेल. सारांश, रुपयाची किंमत कमी केल्यामुळें हिंदच्या निर्गत मालाला थोडी चालना मिळाली तरी ती विशेष मिळेल असें नाहीं व आयातहि पूर्वीच्या किंमतीइतकीच करावी लागल्यामुळें एकंदर व्यवहारांत आपला कांहींच फायदा होणार नाहीं असें दिसतें.

रुपयाची किंमत कमी केल्यामुळें जागतिक बँकेकडून घेतलेलें कर्ज व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सभासदत्वासाठी करावा लागणारा खर्च वाढेल. स्टर्लिंग कर्जापैकीं डॉलर्समध्यें रूपान्तर करण्याचा जो भाग असेल त्यांत हिंदचा तोटा होईल, कारण कमी डॉलर्स हातीं येतील.

आजच्या परिस्थितमुळें हिंदच्या अर्थव्यवस्थेला थोडासा धक्का बसल्याशिवाय राहाणार नाहीं. आयात मालाच्या किंमती वाढल्यामुळें हिंदमधील कारखानी मालाच्या किंमती वाढणें शक्य आहे व त्यामुळें राहाणीचा निर्देशांक किंचित वाढेल. मजुरांकडून पगार वाढीबद्दल मागणी केली जाईल. बाजारभाव व उद्योगधंद्यांत ज्यांना काम मिळूं शकतें अशांची संख्या यावरहि परिणाम होतील. अर्थात सरकारकडुन कार्यक्षम रीत्या नियंत्रणें ठेवलीं गेलीं तर हे परिणाम जाणवणार नाहींत.

आज निर्माण झालेल्या परिस्थितीवर उद्योगपती, बँकर्स, व्यापारी व अर्थशास्त्रज्ञ यांचीं मतें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत श्री. जी. डी. बिर्ला, प्रो. वकील व डॉ. पाणंदीकर यांचीं मतें विशेष मार्गदर्शक वाटतात. श्री. बिर्ला यांनीं 'भारत' पत्राच्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतींत स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, आजची परिस्थिति हें सरकार, उद्योगपती, मजूर व मध्यमवर्गीय जनता या सर्वांना आव्हान आहे. चिकाटीनें काम करून, कामाचे तास वाढवून व उत्पादन वाढवूनच परिस्थितीला तोंड देतां येईल. सरकारनें खर्च शक्य तितका कमी केला पाहिजे. दीर्घ मुदतीच्या पुनर्घटनेच्या योजना लांबणीवर टाकल्या पाहिजेत. प्रत्येक बाबतींत सर्वांनीं काटकसर केली पाहिजे.

सारांश, अमेरिकेचें आर्थिक वर्चस्व पौंडाची किंमत उतरविल्यामुळें पूर्णपणें प्रस्थापित झालें आहे. यापुढें स्टर्लिंग गटांतील उत्पादन शक्ति व अमेरिकेचें व्यापारी धोरण यांवर एकंदर आर्थिक परिस्थिति अवलंबून राहील असें दिसतें. प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेच्या व उत्पादनाच्या कार्यक्षमतेवर त्या त्या देशाची विशिष्ट परिस्थिति अवलंबून राहील. अमेरिकेनें एक प्रकारें स्टर्लिंग गटांतील प्रत्येकाला स्वतःची अर्थ व्यवस्था कार्यक्षम बनविण्याबद्दल जणूं कांहीं गंभीर इषारा दिला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

[४]

### (१३) मॅनेजिंग एजन्सी कंपनी

मॅनेजिंग एजन्सी फर्म खासगी लिमिटेड कंपनी म्हणून नोंदण्याची आतां पद्धत पडली आहे. त्यामुळें कित्येक वेळा वैयक्तिक संबंध कमी होऊन दोषपूर्ण कारभारास वाव मिळतो. पब्लिक कंपनीच्या भागीदारांकडे मॅनेजिंग एजन्सीच्या खासगी लिमिटेड कंपनीचा ताळेबंद व नफातोटापत्रक हीं पाठविण्यांत यावीं आणि तिच्या एक दशांश भागांइतके भाग वर्ग व्हावयाचे असतील तर त्याला पब्लिक कंपनीची स्पेशल ठरावान्वयें संमति व सरकारी मंजुरी आवश्यक असावी, असें बॉंबे स्टॉक एक्सचेंजचें मत आहे.

कित्येक मॅनेजिंग एजंटस स्वतः किंवा दुसऱ्या नांवाखाली खरेदीचे दलाल, विक्रीचे दलाल, शिपिंग एजंट, कमिशन एजंट, इत्यादि व्यवहार करतात. यंत्रसामुग्री, स्टोर्स, कच्चा माल, इत्यादि बाबतींतहि ते पब्लिक कंपनीशीं करार करतात. ही प्रवृत्ति वाढूं नये, ह्यासाठीहि एक्सचेंजनें सूचना केल्या आहेत.

### (१४) बोर्डाची हुकमत आणि देखरेख

डायरेक्टरांची भागीदारांचे प्रतिनिधी ह्या नात्यानें कंपनीच्या सर्व कारभारावर देखरेख व हुकमत चालली पाहिजे. परंतु, आर्टिकल्स ऑफ असोसिएशननें पुष्कळ वेळा त्यावर निर्बंध घातलेले आढळतात. कांहीं महत्त्वाच्या बाबतींत मॅनेजिंग एजंटांना सर्वाधिकार दिलेले असतात आणि नाममात्र अधिकारांवर डायरेक्टरांना संतुष्ट रहावें लागतें. मॅनेजिंग एजंटांच्या ह्या सार्वभौमत्वाचे दुष्परिणाम दिसून आल्याचीं कांहीं उदाहरणें आढळतात. ह्यासाठी, मॅनेजिंग एजंटांनीं सर्व काळ आणि सर्व प्रसंगीं बोर्डाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं आणि नियंत्रणाखालीच व्यवहार केला पाहिजे आणि आर्टिकल्समध्यें कोणत्याहि अटी घालून बोर्डाचा अधिकार मर्यादित केला जाता कामा नये, अशी सूचना बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें केली आहे.

### (१५) जॉ. स्टॉक कंपन्यांचे रजिस्ट्रार

हिंदी कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीचें काम सध्या जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडे आहे. त्यांच्या कचेऱ्या ह्या फक्त नोंदी करण्याचें काम करतात; कायद्याची कसून अंमलबजावणी करण्यासाठीं त्यांचेजवळ योग्य साधनहि नसतें. कंपन्यांचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीनें रजिस्ट्रारला ज्यास्त अधिकार देण्यांत यावे अशी बॉंबे स्टॉक एक्सचेंजची सूचना आहे. भागीदारांच्याकडे ज्या नोटिसा, ठराव, इत्यादि पाठविण्यांत येतात त्या रजिस्ट्रारकडेहि नोंदीसाठी धाडण्यांत याव्यांत आणि रजिस्ट्रारला कंपन्यांच्या कोणत्याहि सभेस उपस्थित होता यावें, अशी कायद्यांत तरतूद असावी, असेंहि स्टॉक एक्सचेंजनें सुचविलें आहे. कायद्यानें किंवा आर्टिकल्सनें आवश्यक सांगितलेल्या बाबी करवून घेण्याचा, कंपन्यांची तपासणी करण्याचा, कायदेशीर इलाज करविण्याचा, इत्यादि अधिकार रजिस्ट्रारला देण्यांत यावे अशीहि स्टॉक एक्सचेंजची सूचना आहे. रजिस्ट्रारची दक्षता व त्याला सरकारचा पाठिंबा, ह्यांच्यामुळें भागीदारांची सुरक्षितता वाढण्यास सहाय्य होईल. विश्वासार्ह आणि कर्तव्यदक्ष मॅनेजिंग एजंटांना त्यापासून भिण्याचें कांहींच कारण नाहीं. रजिस्ट्रारच्या कचेऱ्यांत जमा होणारी माहिती संकलित केल्यानें, कंपन्यांच्या संबधांत अचुक धोरण आंखण्यास सरकारला मदत होईल.

(संमात)

### दि मिरज स्टेट बँक लि.

अहवालाचे वर्षी (३० जून, १९४९ अखेर) वरील बँकेचें शेड्यूल्ड बँकांच्या यादींत नांव दाखल झालें आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील पटवर्धन व इतर छोटीं संस्थानें ह्यांत स्थापन झालेल्या ह्या बँकांत मिरज स्टेट बँकेस हा मान प्रथम मिळाला आहे. बँकेचें वसूल भांडवल ६ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंडांत ५ लक्ष, ५७ हजार रु. आहेत. ठेवींचा आकडा ५१ लाखांवर आहे. दिलेल्या १४ लाखांच्या कर्जांपैकीं १२३⁄४ लाखांचीं कर्जें भरपूर तारणावरील आहेत. काटसकरी व सावधगिरीच्या कारभाराचें बँकेचें वैशिष्ट्य तिनें कायम राखलें आहे. अहवालाचे सालीं बँकेस ६५ हजार रु. नफा झाला. ४% करमाफ डिव्हिडंडला २४ हजार रु. लागतील. (चेअरमन: डॉ. कृ. गो. गोसावी, एल. सी. पी. एस.; मॅनेजर: श्री. कृ. धों. शिराळकर, बी. ए.)

### श्री महावीर को. बँक लि., कोल्हापूर

कांहीं बँकांच्या व्यवहारामध्यें अस्थिरता निर्माण झाली असताहि वरील बँकेच्या ठेवींमध्यें वाढ झाली आहे; गेल्या सहा वर्षांतील ठेवींत १९४८–४९ मधील ठेवी सर्वांत ज्यास्त आहेत. गेल्या वर्षी एकूण उलाढाल १ कोटि, १३३⁄४ लक्ष रुपयांची झाली होती; अहवालाचे वर्षी ती १ कोटि, २३३⁄४ कोटि रुपयांवर गेली. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड वाढत जाऊन आतां त्यांतील रक्कम शेअर भांडवलापेक्षा ज्यास्त झाली आहे, हें अत्यंत अभिनंदनीय आहे. ५ लक्ष, ८८ हजारांच्या खेळत्या भांडवलांत बँकेचें स्वतःचें भांडवल ९९,५१६ रु. आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,१४५ रु. नफा झाला. मुं. को. ॲक्ट कलम ३८ प्रमाणें, बँकेला डिव्हिडंडचा दर गेलीं ८ वर्षे ७१⁄२% होता तो ६१⁄४% करणें भाग पडलें आहे. (प्रेसिडेंट: श्री. ग. सिं. चौगुले; मॅ. डायरेक्टर: श्री. बं. भा. सुलताने; मॅनेजर: श्री. डी. बी. शेटे, बी. ए.)

### दि शिरपूर मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेच्या पटावर तिसऱ्या वर्षअखेर १४० सभासद झाले असून शेअरभांडवल ५०,४०० रु. झालें आहे. ठेवींतहि वाढ आहे. बँकेनें अहवालाचे वर्षी १८ लक्ष, ३४ हजारांच्या हुंड्या खरेदी केल्या. कर्जे ९६,२८० रुपयांचीं ताळेबंदाचे दिवशीं येणें आहेत. एकूण ३,०१,७८४ रु. चें खेळतें भांडवल आहे. निव्वळ नफा ३,१८८ रु. झाला. ६१⁄४% डिव्हिडंडला २,७६० रु. लागतील. (प्रेसिडेंट: श्री. म. शि. वाणी, बी. ए., एलएल. बी.; मॅनेजर: श्री. द. रा. भट.)

### वेंगुर्ला को. अर्बन बँक लि.

ह्या बँकेच्या ३५७ सभासदांनीं ७७,१५० रु. चें भागभांडवल घेतलेलें असून बँकेकडे ठेवी ३,८०,३२० रुपयांच्या आहेत. फंडांत ३९,७७९ रु. आहेत. ठेवींत वाढ होऊन खेळतें भांडवल ७,५३,०५३ रु. झालें आहे. बँकेचा व्यवहार सालोसाल वाढत आहे. बँकेनें ६४ हजार रु. रोख व इतर बँकांत ठेवून ३,०३,६३६ रुपयांची इनव्हेस्टमेंट केली आहे आणि ३,८४,०६४ रु. कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेस निव्वळ नफा ९६०० रु. उरला. ५% डिव्हिडंडला ३,६५९ रु. लागले. बँकेचा 'अ' वर्ग कायम आहे. (चेअरमन: डॉ. वी. एस. नाईक, एम. बी. बी. एस.; मॅ. डायरेक्टर: श्री. डी. डी. शिरसाट, बी. कॉम.)

### दि नगर डि. अर्बन सें. को. बँक लि.

ह्या बँकेचें भांडवल ३,४५,५०० रु. असून रिझर्व्ह फंडांत २,४२,१३७ रु. व इतर फंडांत १,७१,६४७ रु. आहेत. शेअर भांडवलाची मर्यादा एका लाखानें वाढविण्यांत येत आहे. ठोक कापडविक्रीचे कामांत बँकेस ६८,५१० रु. कमिशन मिळालें. व्यापारी नफा ६१,७४२ रु. झाला व ६,०११ रु. देणगी. महात्मा गांधी स्मा. निधीस दिल्यावर ४,८०६ रु. नफा उरला. बँकेच्या नित्याच्या व्यवहारांत ५७,९०९ रु. नफा झालेला आहे. अहवालाचे वर्षी वांबोरी येथें बँकेची शाखा उघडण्यांत आली. तसेंच, कोपरगांव येथें स्थानिक मंडळींनीं एक सहकारी अर्बन बँक स्थापन केल्यामुळें सहकारी संस्थांत चढाओढ होऊं नये म्हणून तेथील शाखा जुलै अखेरपासून बंद करण्यांत आली. बँकेच्या वाढत्या व्यवहाराच्या सोईसाठी, तिच्या इमारती लगत घेतलेल्या जागेवर सध्याच्या इमारतीस जोडून इमारत बांधण्याचें ठरलें आहे. सध्याचे रेकॉर्डरूममध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स बांधण्यांत येतील. (चेअरमन: श्री. मो. कुं. फिरोदिया, बी. ए., मॅनेजर: श्री. त्र्यं. वि. निसळ, सी. ए. आय. आय. बी.)

---

### दि पंढरपूर अ. को बँक लि.

वरील बँकेच्या पटावर १२५७ सभासद आहेत. वसूल भांडवल ४८,९३० रु. असून रिझर्व्ह फंडांत २९,३७४ व इतर फंडांत ३३,४२४ रु. आहेत. एकूण ताळेबंद ९ लक्ष, ५७ हजार रुपयांचा आहे. सालअखेर येणों कर्ज ३,४२,५९४ रु. असून थकबाकीचें प्रमाण ४·९% वरून ३·९% वर उतरलेलें आहे. इनव्हेस्टमेंटमध्यें बँकेनें २,७६,७०६ रु. गुंतवलेले आहेत. दिलेल्या घेतलेल्या हुंड्या—चेक्सची संख्या व त्यांची रक्कम पुष्कळच वाढली आहे, व या व्यवहारात बँकेस ४,६८२ रु. कमिशनचें निवळ उत्पन्न झालें आहे. गेलीं ५ वर्षें बँक सतत 'अ' वर्गांत आहे. बँकेस कापड रेशन दुकानांत ९०६ रु. व धान्य रेशन दुकानांत ३६५ रु. नफा झाला. बँकेच्या नेहमीच्या व्यवहारांतील नफा १०,६८१ रु. आहे अहवालाचे वर्षी बँकेचे दिवाणखान्यांत आचार्य भागवत ह्यांचे हस्तें म· गांधींचें तैलचित्र लावण्यांत आलें. (चेअरमन: श्री. वा. कृ. उत्पात, बी. ए., एलएल. बी.; मॅनेजर: श्री. एन. सी. घाणेकर)

---

### विटा मर्चंटस को. बँक लि.

वरील बँकेनें गेल्या तीन वर्षांत चांगली प्रगति केली आहे. १९४६–४७ अखेर शेअर भांडवल ५२,३८० रु. होतें तें आतां ७८,६४० रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड २२,१३४ रुपयावर गेले आहेत. खेळतें भांडवल ५,६७,११५ रु. आहे. त्यांपैकीं २,८७,८०० रु. कर्जांत गुंतवलेले असून चालू सालीं थकबाकी मुळीच नाहीं, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेचा 'अ' वर्ग कायम आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ८,३०९ रु. नफा झाला. हा नफा इमारत फंड, कर्जबूड फंड, म. गांधी स्मारक फंड, इत्यादींची तरतूद करूनच काढलेला आहे. (चेअरमन: श्री. ना. दा. महाजन. मॅनेजर: श्री. श्री. ग. कुलकर्णी.)

---

खून साफ करनेमें मशहूर
डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
पॅलेस स्ट्रीट, सातारा.
शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :
१ वर्ष रु. २–८–० ; दोन वर्षे रु. २–१२–० ; तीन अगर अधिक वर्षे ३ रुपये

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.



## व्यापारांतील खांचा खळगे.
(३)

लेः—ना. अ. तेंडोलकर,
मॅ. डायरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि. कोल्हापूर.

### दिवाळखोरीची पूर्व तयारी

उधारी ही आमच्या व्यापारास लागलेली मोठी कीड आहे. कोणताहि व्यापार व तो कोणाशीहि असो, उधारी ही ठरल्यासारखी असावयाचीच. लहानसहान व्यक्तीपासून तों मोठमोठी कारखानदारीहि यास अपवाद असत नाहीं. यांपैकी कोणाचेंहि येणें बाकी तगादा केल्याखेरीज म्हणून यावयाची नाहीं. उधारीमुळें भांडवल जसें बिनव्याजी अडकून पडतें त्याप्रमाणेंच ती वसूल करण्यासाठींहि जीव बेजार होऊन जातो. नवीन माल खरेदीसाठी भांडवलाची अडचण पडते व मुख्य म्हणजे मोठ्या प्रमाणावर बूड येते. उधारी ही कोणत्या प्रमाणावर वाढूं शकेल यासहि कांहींच नेम असत नाहीं. पुष्कळ वेळां पूर्वींचीं बिलें वसूल करण्यासाठी म्हणून नवीन उधारी द्यावी लागते व ही बाकी फुगतच असते. यामुळें नवीन व्यापाऱ्याचा जीव मेटाकुटीस येतो. मोठा व झटपट व्यापार करण्याच्या भरीस पडून व पूर्व अनुभव नसल्यानें केलेली उधारी म्हणजे रुपयाचे चार आणे भांडवल होय! व्यापारांत झटपट व्यापाराइतकेंच किंबहुना यापेक्षां अधिक महत्त्व रोखीच्या व्यापारास आहे.

या उधारीनें जसा नवीन व्यापाऱ्याचा जीव मेटाकुटीस येतो त्याच्या जोडीसच व्यापारी व कारखानदार यांचेकडून त्याचे गळयांत बांधल्या जाणाऱ्या भरमसाट पडीक मालामुळेंहि त्याचा जीव बेजार होतो. सुरवाती सुरवातीस व्यापारी, कारखानदार व त्यांचे प्रतिनिधी यांचेवर तो प्रामाणिकपणें विश्वास ठेवतो व हे सर्व आपला ज्यास्तींत ज्यास्त व खच्यतर न खपणारा माल त्याचे गळयांत बांधण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करतात. कारण, अनुभवी व्यापारी ठराविक मुदतींत खपेल असाच माल घेत असतो व त्याला कोणत्या मालास मागणी आहे याची माहिती असल्यानें त्याला चकवितां येत नाहीं. आपल्या बाजारपेठांतून ठराविक मार्कचाच माल विशेष प्रमाणावर खपत असून इतर मालास रुपयांतील चार आणेहि मागणी नाहीं हें समजण्यास नवीन व्यापाऱ्यास वर्ष-दोन वर्षांचा अवधी लागतो व या मुदतींत त्याचें बहुतेक सर्व भांडवल पडिक माल खरेदींत गुंतलेलें असतें, कीं ज्याचा लिलांव केला तरी रुपयांतील चार आणे येण्याची शक्यता असत नाहीं.

### बाजारपेठांची मागणी

उधारी, पडीक माल यांचे जोडीस नवखा व्यापारी फसला जात असेल तर तो एजन्सीच्या नादानें होय. आपणांकडे कांहींतरी विशेष (मोनापली) असावें व आपणांस दरमहा कांहीं हमखास उत्पन्न करतां यावें म्हणून प्रत्येक नवा व्यापारी सुरवातीस एजन्सी मिळविण्यासाठी धडपडत असतो; कारण मोठमोठ्या प्रख्यात कंपन्यांचे एजंट चांगलेच गब्बर झाले असून, विनासायास कमाई करीत आहेत, असें त्याच्या आढळांत येतें. सहाजिकच नवीन व्यापारास जी एजन्सी मिळावयाची ती नवीनच मालाची (अनेक बाबतींत) असणार! आपण परिश्रम केल्यास, माल स्वस्त दिल्यास, उधारीनें दिल्यास, जाहिरात केल्यास कोणत्याहि चालू मालाइतका हा माल खपवूं असें त्यास सुरवातीस वाटत असते. नव्या व्यापाऱ्याच्या या अज्ञानाचा फायदाहि हे कारखानदार भरपूर घेतात. (अ) मोठमोठे डिपॉझिट्स् अल्प व्याजानें किंवा बिनव्याजी घेणें, (आ) भरमसाट माल, तो खपेल किंवा न खपेल याचा विचार न करतां त्याचे गळयांत रोखीनें बांधणें, (इ) हा माल बांधताना आम्ही न खपणारा माल परत घेऊं, मोठी जाहिरात करूं, वगैरे अनेक आश्वासनें देण्यांत येतात. जेव्हां व्यापारास सुरुवात करून चारसहा महिने लोटतात तेव्हां त्यास असें आढळतें कीं आमच्या बाजारपेठांतून ठराविक प्रकारच्याच मालास मागणी असते. नवा माल विक्रीस ठेवावयाचा झाल्यास व्यापारी उधारीनें माल खपेल तेव्हां पैसे देण्याचे अटीवर मागतात, अतिशयच कमी किंमतीस मागतात. त्याचा उठाव होत नाहीं व कारखानदारहि आपल्या वचनांची पूर्तता करीत नाहीं. डिपॉझिटच्या रकमाहि बुडण्याची पाळी येते. याचे जोडीसच नव्या व्यापाऱ्यास स्थानिक व्यापाऱ्याकडून सहकार्य मिळत नाहीं. जे व्यापारी मोठमोठ्या व्यापाऱ्याकडून रोखीनें माल आणतात तोच माल ते नवीन व्यापाऱ्याकडून उधारीनें मागतात व बिल देण्यांत फारच विलंब करतात किंवा अत्यंत कमी भावांत मागतात.

आज व्यापारांत खरी खबरदारी कोणती घ्यावयास पाहिजे असेल तर तो म्हणजे कोठेहि डिपॉझिट म्हणून रकम न गुंतविणें व नव्यानेंच अस्तित्वांत आलेल्या कंपन्यांकडे ॲडव्हान्स म्हणून रकम न पाठविणें ही होय. कारण, आजकाल अनेक नवीन कंपन्या व्यापार-उद्योगधंदा करण्याच्या हेतूपेक्षा दुसऱ्यांना फसवून त्यांचे पैसे लुबाडण्याच्या हेतूनेंच अस्तित्वांत येत आहेत. त्यांच्या जाहिराती, पोष्ट बॉक्स मार्फतचा पत्रव्यवहार, मोठमोठी शिर्षकं, अनेक बँकांची व कंपन्यांची त्यावर छापलेली नांवें, यांना भुलून बऱ्याच व्यापाऱ्यांनीं ॲडव्हान्स पाठवून आपल्या रकमा गमावल्याचें वारंवार आढळांत येतें. (अपूर्ण)

**इजिप्तमध्यें रशिआचें रंगीत कापड**—इजिप्तच्या कापडाच्या बाजारांत रशिआंत बनविलेलें रंगीत कापड बऱ्याच मोठ्या प्रमाणावर येऊं लागलें आहे. हें कापड रंगित कापसाच्या सुताचें विणलेलें असल्यानें कापड रंगविण्याच्या खर्चाइतकें तें इतर रंगीत कापडापेक्षा स्वस्त पडतें. रंगित कापूस पिकविण्याचा शोध रशिआनें जर्मन शास्त्रज्ञांच्या मदतीनें लावला असं म्हणतात.

**ट्रॅक्टर चालविण्याचा सरकारी वर्ग**—पुणें येथील ट्रॅक्टर चालविण्याच्या शिक्षणाचा वर्ग आणखी एक वर्ष चालू ठेवण्यांत येईल. ह्या वर्गाची योजना गेल्या ऑक्टोबर महिन्यांत एका वर्षापुरती मंजूर करण्यांत आली होती. तीनुसार ४० उमेदवारांना ट्रॅक्टर चालविण्याचें शिक्षण देण्यांत आलें. आतां आणखी ४० ट्रॅक्टर चालविणारी माणसें तयार करण्यांत येणार आहेत. ह्या वर्गासाठी सरकारला ४,७०० रुपये खर्चावे लागतील.

बेडेकर पापड

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} *मॅनेजिंग डायरेक्टर.*

# बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल जि. कुलाबा.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ५०,००,००० |

शाखा

मुंबईः—६५।६७ झव्हेरी बझार. | पुणेंः—१२६८ भवानी पेठ.
अहमदनगरः—बझार पेठ. | बेलापूररोडः—पोस्टासमोर,
कल्याणः—शिवाजी चौक. | भिवंडीः—बझार पेठ.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया-अध्यक्ष.
" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " विरदीचंद भूरचंद बांठिया-मॅ.डायरेक्टर.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)
*श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला (सेंट्रल ऑटो सर्व्हिस)
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी अहमदनगर.

श्री. रा. गणेश भैरव साठे, जनरल मॅनेजर.

★ *बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

श्री. वालचंद सी. श्रीमाळ, बी. कॉम.
मॅनेजर, पुना ब्रँच.

# भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.


| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. | श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पुणें कचेरी ५१५ बुधवार } अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.



## सहकारी चर्चा मंडळ, पुणें

### पहिला वाढदिवस समारंभ

सहकारी चर्चा मंडळ, पुणें ह्या संस्थेचा पहिला वाढदिवस समारंभ गुरुवार, ता. २९ रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत मोठ्या उत्साहानें साजरा झाला. समारंभास सहकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येनें उपस्थित होते. प्रथम मंडळाचे अध्यक्ष श्री. रा. य. बोरकर ह्यांनीं स्वागतपर भाषण केल्यावर मंडळाचे एक चिटणीस श्री. ना. दा. द्रवीड ह्यांनीं वार्षिक कामाचा आढावा वाचून दाखविला. दुसरे चिटणीस श्री. ज. द. वैद्य ह्यांनीं संदेश वाचून दाखविले. समारंभाचे अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं चर्चा मंडळाच्या उपक्रमाचा गौरव करून त्याचा सहकारी प्रगतीस कसा मोठा उपयोग होण्याजोगा आहे ह्याचें विस्तृत विवेचन केलें आणि चर्चामंडळाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीनें कांहीं सूचनाहि केल्या. श्री. य. द. खोले ह्यांनीं आभार मानल्यावर समारंभ संपला.

### चर्चा मंडळांतील व्याख्यानें

सहकारी चर्चा मंडळाचें उद्‌घाटन १-१०-४८ रोजीं, विजया दशमीचे मुहूर्तावर, श्री. श्री. वा. काळे, संपादक, अर्थ, ह्यांच्या व्याख्यानानें झालें. २-१-४९ रोजीं प्रि. गाडगीळ ह्यांनीं "भावी अर्थव्यवस्थेंत सहकाराचें स्थान" ह्या विषयावर व्याख्यान दिलें. बाकीच्या व्याख्यानांचा तपशील खालीं दिला आहे. ग्रामीण सहकारी संस्थांचें काम कसें चालतें याची माहिती होण्याच्या दृष्टीनें रविवार दि. ५-१२-४८ ला मुक्काम वरवंड येथील सहकारी संस्थेचे वार्षिक सभेस हजर रहाणेसाठीं एक सहल ठरविण्यांत आली, त्यांत नऊ सभासदांनीं भाग घेतला होता.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| २३-१०-४८ | ना. वि. पांडव | ताळेबंद |
| ५-११-४८ | एस. ए. कानगो | नागरी बँका |
| २१-११-४८ | य. द. खोले | सहकारी चळवळी-विचार |
| ४-१२-४८ | " " | " |
| १८-१२-४८ | ग. र. तुळशीबागवाले | नवीन सहकारी कायदा |
| ८-१ -४९ | रा. द. भट | ग्राहक संघाचें भवितव्य |
| १९-२ -४९ | एस. एल्. ओगले | सहकारी शिक्षण |
| ५-२ -४९ | वि. ना दात्ये | ग्राहक संघाविषयीं विचार |
| ५-३ -४९ | व्ही. एस्. भागवत | सहकारी ग्राहक संघ |
| २-४ -४९ | ना. द. द्रवीड | को. हौसिंग सोसायटी |
| १७-४-४९ | | मंडळाची सहामाही सभा |
| ३०-४-४९ | मो. ना. पाटसकर | सहकारी चळवळीचे अनुभव |
| १४-५-४९ | गो. शं. देशमुख | सहकारी बँका व्यापारी बँकांच्या कार्यक्षेत्रांत अतिक्रमण करीत आहेत काय ? |
| २३-७-४९ | ना. वि. पांडव | ग्रामीण जीवन सहकार |
| ६-८-४९ | ज. द. वैद्य | एका पतपेढीचा वा. अहवाल |
| २०-८-४९ | रा. द. भट | ग्रामपंचायतींची जागा सहकारी संस्था घेऊं शकतील काय ? |
| ३-९ -४९ | रा. य. बोरकर | सहकारी संस्थांच्या निवडणुका |
| १७-९-४९ | य. द. खोले | लंकाद्वीपांतील सहकारांदोलन |

चर्चा मंडळाचे एक चिटणीस, श्री. रा. द. भट ह्यांना बडोदा अन्योन्य सहकारी मंडळी लि. नें भरविलेल्या निबंधस्पर्धेत अहवाल वर्षी बक्षिस मिळालें आहे. मंडळाच्या सभासदांची आजची संख्या ४५ आहे.

### दि बॉंबे प्रॉ. को. लॅंड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें अहवालाचे वर्षी ४,७९,२८० रुपयांचीं २४७ नवीं कर्जे दिलीं; गेल्या वर्षी १,८३,६१५ रुपयांचीं १२२ कर्जे देण्यांत आलीं होतीं. आतां एकूण कर्ज येणें २९,३०,५७४ रु. आहे. गेल्या वर्षी येणें मुद्दलापैकी ८५% वसूल झालें होतें, तें अहवालाचे वर्षी ७९% झालें. व्याजाची वसुलीहि ९९% ची ९५% झाली. नफा ३५,१७१ रु. उरला (चेअरमन: श्री. नागिनदास टी. मास्टर, एम. ए.; एलएल. बी.; मॅनेजर: श्री. बी. एन. देसाई)

### दि इचलकरंजी सें. को. बँक लि.

मागील वर्षाचे अखेरीस बँकेचें वसूल भांडवल ४४,४७५ रु., एकूण फंड ७५,४९५ रु. व स्वतःचें भांडवल १,१९,९७० रु. होतें. तेच आकडे आतां अनुक्रमें ८३,९५० रु., ८९,६२५ रु. व १,१९,९७० रु. असे झाले आहेत. ठेवींची रक्कमहि दीड लाखांनीं वाढून खेळतें भांडवल १३ लक्ष, ९१ हजारांचें १५ लक्ष ९७ हजार झालें आहे. हे सर्व आकडे उत्कृष्ट प्रगतीचे निदर्शक आहेत. बँकेस २१,८१३ रु. नफा झाला. संस्थानाच्या विलिनीकरणानंतर बँकेची नवी घटना आवश्यक होणार असल्यानें बोर्डाची निवडणूक स्थगित केली आहे. (चेअरमन: श्री. ग. दे. शेटी, मॅनेजर: श्री. दौ. रा. काळे)

### दि बेळगांव डि सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षी बेळगांव डि. सें. को. बँकेचें शेअर भांडवल १,७४,१०० रु. नीं वाढून तें आतां ६,९२,५५० रु. झालें आहे. ठेवींच्या रकमेंतहि पावणे सात लक्ष रुपयांची वाढ होऊन एकूण ठेवी ६२$\frac{3}{4}$ लक्ष रुपयांच्या झाल्या आहेत. खेळतें भांडवल ८८$\frac{3}{4}$ लक्ष रुपये झालें आहे. त्यांत बँकेचें स्वतःचें भांडवल ११$\frac{3}{4}$ लक्ष रुपये आहे. चिकोडी, निपाणी व बैलहोंगल शाखांमार्फत रेशन दुकानें चालविण्यांत येत आहेत. बँकेचे २० वर्षे डायरेक्टर असलेले पूज्य सहकारी श्री. कल्लय्यास्वामी कवटगीमठ हे १७ ऑगस्ट १९४९ रोजीं मृत्यु पावले. त्यांच्या आस्थेवाईक व उत्साही कार्याचा गौरवपर उल्लेख डायरेक्टरांचे रिपोर्टांत करण्यांत आला आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ४१,४६९ रु. नफा झाला. (चेअरमन: श्री. पी. बी. उगरगोळ, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर: श्री. व्ही. सी. मेडलेरी)

## औद्योगिक सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यांतील औद्योगिक सहकारी सोसायट्यांच्या अनट्रेंड सेक्रेटरींसाठीं ट्रेनिंग क्लास, प्रॉव्हिंशिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि., मुंबई, यांचे सूचनेवरून ता. १०-१०-४९ ते १५-११-४९ अखेर एक महिना मुदतीचा भरवावयाचा आहे. ज्या औद्योगिक सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीस अगर उमेदवारास सदर शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार इसमाकडे ता. ८-१०-४९ चें आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. २ पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण व्ह. फा. पर्यंत घेतलेलें पाहिजे अगर सहकारी संस्थेंत काम करीत असलेला अगर एक वर्ष मुदतीचा अनुभव घेतलेला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. उमेदवारांनीं नाशिक येथील "न्यू हॉयस्कूल" गांधी रोड (जुना हत्तीखाना रोड) येथें तारीख १०-१०-४९ रोजीं सकाळीं ८ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

मे. एक्स ऑफिसिओ सेक्रेटरी डिस्ट्रिक्ट को. बोर्ड, नाशिक यांचे मार्फत.

N. Y. Kulkarni,
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर
नाशिक (घर नं. २१७८, मधली होळी).

दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट– ( ) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे

मॅनेजिंग डायरेक्टर

# दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिली जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार

मॅनेजर

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—यच्चयावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.